# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे — ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email: pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


**परिपत्रक: १८९ /२०२४**

**विषय :— ''शुल्काची माहिती महाविद्यालय/परिसंस्था यांनी संकेतस्थळावर/सूचना फलकावर प्रसिद्ध करणेबाबत...''**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त शैक्षणिक परिसंस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग, आर्थिक दुर्बल घटक, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग तसेच इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतात. या घटकातील पात्र विद्यार्थ्यांना विहित अभ्यासक्रमासाठी शासनामार्फत MAHADBT Portal वर दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती/फ्रिशिपकरिता अर्ज करतात अशा विद्यार्थ्यांची शासनाकडून शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्काची प्रतिपुर्ती करण्यात येते. शिष्यवृत्ती करिता पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यात येवू नये तसे यापूर्वीच आपणास निर्देश देण्यात आलेले आहेत. तरीही बरीच महाविद्यालये/परिसंस्था विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारत असल्याच्या किंवा जादा शुल्क घेत असल्याबाबत विद्यार्थी/विद्यार्थी संघटना यांच्याकडून या कार्यालयास तक्रारी प्राप्त होत असतात. त्यामुळे तक्रारीचे निरसन करण्याकरिता या कार्यालयाचा बराच वेळ वाया जातो.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०१ अन्वये गठित केलेल्या समितीने विविध अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित केलेले आहे. सदरचे शुल्क विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तसेच व्यावसायीक अभ्यासक्रमाचे शुल्क हे शुल्क नियामक प्राधिकरण (FRA) कडून निश्चित केले जाते.

या परिपत्रकाद्वारे सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था यांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाने/शुल्क नियामक प्राधिकरणाने ठरविलेले अभ्याक्रमनिहाय शुल्क आपल्या महाविद्याल्याच्या संकेतस्थळावर तसेच सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावे. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारत असल्याबाबत किंवा जादा शुल्क आकारल्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास नियमानुसार संबंधित महाविद्यालयावर शासन/विद्यापीठ नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड पुणे — ७ }
संदर्भ : शै. प्रवेश/२५४१ }
दिनांक : १९/०८/२०२४ }

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव,

प्रत:
१. मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx